# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.३१ दिनांक २६/०३/२०२१

## स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचेकडुन अवैधरीत्या डीझेल या ज्वलनशिल पदार्थांचा साठा करुन विक्री करणा-या आरोपीतांस अटक

दिनांक २५/०३/२०२१ रोजी ०३.४५ वा.चे सुमारास तलासरी पोलीस ठाणे हद्दीत मौजे अच्छाड गावचे हद्दीत मुंबई अहमदाबाद महामार्गाचे मुंबई वाहीनीचे बाजुस असलेल्या सर्व्हीस रोडवर टेम्परारी टप-यांचे बाजुस आरोपीत याने आपले ताब्यात अवैधरीत्या डीझेल या ज्वलनशिल पदार्थांचा साठा करुन विक्री करण्याकरीता विनापरवाना आपल्या कब्जात बाळगला असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर ठिकाणी छापा टाकला असता यातील एक आरोपीत इसम वय ३९ वर्षे, धंदा-ट्रान्सपोर्ट याचे ताबे कब्जात खालील प्रमाणे मुद्देमाल मिळुन आला. १) ४,५०,०००/- रु. किंमतीचा एक आयसर टेम्पो चॉकलेटी रंगाचा, त्याचा रजिस्टर क्रमांक जीजे-०६/बीटी-२७०६ असा असलेला. २) ६०,०००/- रु. किंमतीचे रेट मिटर, डिझेल भरण्यासाठी वापरात येणारे, त्यास एक नोझल पाईप लावलेला व बॅटरीचे कनेक्शन दिलेले. ३) ९०००/- रु. किंमतीचे एकुण ३ प्लास्टीकच्या सुमारे २००० लिटरच्या टाक्या. त्या एकमेकांना खालील बाजुस पाईपने जोडलेल्या व अर्धवट डिझेल सदृष्य ज्वलनशिल द्रवपदार्थाने भरलेल्या. ४) २,१७,५००/-रु.किंमतीचे आयसर टेम्पो मधील तिन प्लास्टीकचे टाक्यांमध्ये असलेले सुमारे २५०० लिटर डिझेल सदृष्य द्रव पदार्थ ५) ९०००/- रु. एक एस.पी.कंपनीची लाल रंगाची इन्र्हटर बॅटरी, त्याच्या वायरी रेट मिटर व विजेरी दिव्यास जोडलेल्या. ६)१,००/-रु.किंमतीचे दोन प्लास्टीकच्या बकेट. ७)७०/- रु. किंमतीचा एक विजेरी दिवा. असा एकुण ७,४५,०००/- रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीत याचे विरुध्द <u>तलासरी पोलीस ठाणे</u> गु.र.नं. ।। ४१/२०२१ भा.दं.सं.क. २८५,३४ सह अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ७ प्रमाणे, गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यास दिनांक २५/०३/२०२१ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास पोउनि/आशिष पाटील, नेम-स्थानिक गुन्हे शाखा, बोईसर युनिट, हे करित आहेत.

सदरची कारवाई पोनि/रविंद्र नाईक, प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक/आशीष पाटील व स्थानिक गुन्हे शाखा, बोईसर युनिटचे पोलीस अंमलदार यांनी केली आहे.